CNR-MHCH030008392024

न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक १४ ऑगस्ट, २०२६ रोजी)

प्रस्तुत खटला आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९, कलम ६५(ई) अन्वये असलेला दोषारोप सिध्दतेसाठी चालविण्यात आला आहे.

०२. प्रस्तुत प्रकरणात गु.र.क्र.२७७/२०२३ दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, चंद्रपूर येथे नोंदवून तपास दुय्यम निरीक्षक श्रीमती मोनाली कुरूडकर यांनी केला. तपासादरम्यान तिने साक्षीदारांचे बयाण नोंदवीले, रासायनिक पृथःकरणाचा अहवाल हस्तगत करून दाखल केला. तपासाअंती आरोपीविरुद्ध पुरावा मिळून आल्याने त्याचेविरूद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

०३. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९, कलम ६५(ई) अन्वये गुन्ह्याचे अभिवचन नि.क्र.१२ वर ठेवण्यात आले. आरोपीने अभिवचन नाकारल्यामुळे त्याचेविरुद्ध खटला चालविण्यात आला.

०४. अभियोग पक्षाने प्रस्तुत खटल्यामध्ये साक्षिदार क्र.१ प्रविकांत भगवान निमगडे यांची साक्ष नोंदविलेली आहे. अभियोग पक्षाला इतर साक्षिदारांचा पुरावा देण्याची वेळोवेळी संधी देण्यात आलेली असून, त्याप्रमाणे साक्ष समन्स काढण्यात आलेले आहे. परंतु, कोणीही साक्षीदार साक्ष देण्याकामी न्यायालयात हजर झालेले नाहीत. त्यामुळे सदर खटल्याचे स्वरूप व वय पाहता, नि.क्र.१ वर आदेश पारीत करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे.

०५. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब)

अन्वये तपासण्यात आलेले आहे.

०६. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अधिवक्ता श्री. आर. जे. खोब्रागडे व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम. आय. कातकर यांचा युक्तीवाद ऐकला.

०७. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. निर्णीतीसाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व निष्कर्षाची कारणमिमांसा पुढील प्रमाणे.

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१.	दिनांक २७/१०/२०२३ रोजी १०.०० वाजताचे दरम्यान पडोली ते घुग्घूस रोडवरील एम.आय.डी.सी. हद्दीतील निखील नावाच्या ढाब्यामध्ये, पडोली, ता. चंद्रपूर, जि. चंद्रपूर येथे आरोपी त्याचे ताब्यात देशी दारूच्या बाटल्या विनापरवाना व अवैधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळून आला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो का ?	नाही
२.	आदेश काय ?	आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते

का र ण मि मां सा

०८. आरोपीविरूद्धचा दोषारोप सिद्ध करण्याकरीता ''आरोपी हा वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी त्याचे ताब्यात देशी दारूच्या बाटल्या विनापरवाना व अवैधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून असतांना मिळून आला'' हे सिद्ध करणे आवश्यक आहे.

मुद्दा क्र.१ करीता

०९. आरोपीविरूद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने साक्षदार क्र.१ श्री. निमगडे यांचा पुरावा नोंदविला आहे. सदर साक्षिदाराने त्याचे पुराव्यामध्ये असे कथन

केलेले आहे की, दि.२७/१०/२०२३ रोजी ते अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, चंद्रपूर येथे कार्यरत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, संजय राठी हा अवैधरित्या दारूची विक्री करीत आहे. त्यानंतर ते व त्यांचे अधिकारी घुग्घूस रोडवरील ढाब्याजवळ गेले. त्यांच्या साहेबांनी आवाज दिला असता आरोपी तेथे हजर होता व त्याने त्याचे नांव संजय राठी असे सांगितले. त्यांचे साहेबांनी ढाबा चेक केला असता ढाब्याच्या काऊंटर खाली ९० मि.ली. क्षमतेच्या १२१ देशी दारूच्या बाटल्या मिळून आल्या. त्यापैकी एक बाटली सी.ए. करीता काढून घेतली. उर्वरीत मालासह कार्यालयात जाऊन त्यांनी आरोपीविरूद्ध फिर्याद दिली. सदर साक्षिदाराने त्याचे उलटतपासात हे मान्य केले की, त्यांनी जातांना स्टेशन डायरीला नोंद केली होती. तो ढाबा आरोपीचे मालकिचा असल्याबाबतचे कागदपत्र त्यांनी पाहिले नाही. या व्यतिरीक्त त्यांनी बचाव पक्षाच्या इतर सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिलेली आहेत.

१०. अभिलेखावरील साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सा.क्र.१ श्री. निमगडे यांनी घटनास्थळावर घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला याबाबत काहीही कथन केलेले नाही. तसेच अभियोग पक्षाने स्वतंत्र साक्षिदारांचा पुरावा नोंदविलेला नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा सिद्ध झालेला नाही. सा.क्र.१ श्री. निमगडे यांनी ज्या ठिकाणी छापा टाकला होता तो ढाबा कोणाच्या मालकिचा आहे याबाबतची कागदपत्रे त्यांनी पाहिली नाहीत व त्याबाबतची माहितीही घेतलेली दिसून येत नाही. अभियोग पक्षातर्फे रासायनिक पृथ:करणाचा अहवाल दाखल करण्यात आलेला आहे. परंतु, सदरचा अहवाल हा जप्त केलेल्या मुद्देमालाचाच आहे, याबाबतचा पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर आणलेला नाही. सदरचा मुद्देमाल तपासणीकामी घेऊन गेलेल्या पोलीस कर्मचा–याचे बयाण न्यायालयासमोर नोंदविलेले

नाही. करीता, सदरहू दारू ही आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केली होती, ही बाब पुराव्याअभावी सिद्ध होऊ शकली नाही. तपासी अंमलदार यांनी कोणत्याही स्वतंत्र साक्षिदारांचे बयाण नोंदविलेले नाही. त्यामुळे, अभियोग पक्ष आरोपी हा स्वतःजवळ विनापरवाना व अवैधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने दारु बाळगून असतांना मिळून आला, ही बाब सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे, असे मत नोंदवून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

मुद्दा क्र. २ करीता

११. मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरून आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. प्रस्तुत खटल्याचे बारकाईने अवलोकन केले असता, त्यामध्ये ९० मि.ली. क्षमतेच्या १२१ रॉकेट संत्रा देशी दारूच्या बाटल्या जप्त असल्याचे दिसून येत आहे. सदर मुद्देमालाची विल्हेवाट लावण्यासाठी सदरचा मुद्देमाल आवाहनाचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतर निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे पाठविणे योग्य व न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

आदेश

१. आरोपी संजय मोहनलालजी राठी, राहणार – लहुजी नगर, एम.आय.डी.सी., ता. व जि. चंद्रपूर याची महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) अन्वयेच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जात मुचलके व बंधपत्रे रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल प्रत्येकी प्रत्येकी ९० मि.ली. क्षमतेच्या १२१ देशी दारूच्या बाटल्या विल्हेवाटीकरीता अपीलाचा कालावधी संपल्यानंतर निरीक्षक, राज्य उत्पादन

शुल्क अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे पाठविण्यात यावी.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ प्रमाणे सदर न्यायनिर्णयाविरूद्ध अपिल दाखल झाल्यास अपील न्यायालयासमोर उपस्थीत होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता रक्कम रुपये ५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHIVAJI RADHU GULAVE
Date: 2026.08.14 17:38:53 +0530

(शिवाजी आर. गुळवे)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.४), चंद्रपूर

स्थळ :– चंद्रपूर
दिनांक :– १४/०८/२०२६

प्र मा ण प त्र

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. करून अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव	:	सुचिता शै. राऊत, लघुलेखक श्रेणी–३.
न्यायालयाचे नांव	:	न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कोर्ट क्र.४, चंद्रपूर.
न्यायनिर्णयाची तारीख	:	१४/०८/२०२६
न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख	:	१४/०८/२०२६
न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख	:	१४/०८/२०२६